**विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय, व विशेष सहाय्य विभाग,**

शासन निर्णय क्रमांक: गृनियो-२०११/प्र.क्र.१११/विजाभ-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २७ डिसेंबर, २०११.

**प्रस्तावना :-** देशाच्या स्वातंत्र्यानंतर ६४ वर्ष उलटूनही भटक्या विमुक्त समाज अद्यापही २समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकलेला नाही. या समाजास विकासाच्या मूळ प्रवाहात आणणे गरजेचे आहे. भटक्या विमुक्त समाजाचे राहणीमान उंचवावे, त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढावे, त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी म्हणून त्यांना जमीन उपलब्ध करून तेथे वसाहत उभी करणे व त्याठिकाणी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे आवश्यक आहे. सद्या अस्तित्वात असलेल्या विजाभजच्या मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजनेंतर्गत २० टक्के लाभार्थ्यांचा सहभाग, ३० टक्के शासनामार्फत बांधकाम अनुदान व ५० टक्के वित्त संस्थांकडून कर्ज उभारणी संस्थेने करावयाची आहे. वार्षिक उत्पन्न रु. ५०,०००/- पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना रु.६०,०००/- ते रु.१,००,०००/- मर्यादेत बांधकाम अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात येते. तसेच या योजनेंतर्गत पात्र संस्थांना शासकीय जमिन अथवा खासगी जमिन विकत घेण्यासाठी जमीन अनुदान मंजूर करण्यात येते. तथापि संस्थेतील सभासदांना कोणत्याही वित्तीय संस्थां कर्ज मंजूर करत नसल्याने अनुदान अदा केले जात नाही. तसेच संस्थेतील लाभार्थीचे उत्पन्न कमी असल्याने वित्तीय संस्थां त्यांना वैयक्तिक कर्ज उपलब्ध करत नाहीत. त्यामुळे सदर संस्थेची घरे पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. सदर योजनेसाठी उत्पन्न मर्यादा कमी असल्यामुळे तसेच दिवसेंदिवस बांधकाम साहित्याच्या खर्चात होत असलेली वाढ विचारात घेता योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विमुक्त जाती, भटक्या जमाती या घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-** या आदेशान्वये राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटुंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी ग्रामीण भागातील विमुक्ती जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील घटकांसाठी राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

या योजनेखाली राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटुंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी यासाठी ग्रामीण भागामध्ये अशा कुटुंबांना प्रत्येकी पाच गुंठे जमिन उपलब्ध करुन देवून त्यावर त्यांना २६९ चौ.फु.ची घरे बांधून देणे व उर्वरित जागेवर लाभार्थी कुटूंबांना विविध शासकीय योजनांद्वारे स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. या करीता राज्यातील ग्रामिण भागातील एकूण ३३ जिल्ह्यांमधील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गांची जास्त लोकसंख्या असलेली प्रत्येक जिल्ह्यातील ३ गावे निवडण्यात येऊन त्या गावातील एकूण २० कुटूंबांना उक्त योजनेचा लाभ देण्यात येईल. त्या अनुषंगाने सन २०११-१२ या आर्थिकवर्षात राज्यातील ३३ जिल्ह्यातील प्रत्येकी एका गावाची निवड करण्यात यावी. सन २०१२-१३ पासून दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यातील ३ गावांची या योजनेसाठी निवड करण्यात येईल.

२. प्रत्येक जिल्ह्यात तीन वसाहती व प्रत्येक वसाहतीत २० लाभार्थी या प्रमाणे ग्रामिण क्षेत्र असलेल्या राज्यातील एकूण ३३ जिल्ह्यात दरवर्षी एकूण ९९ वसाहती निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.सदर प्रत्येक वसाहतीस पाणी पुरवठा, विज पुरवठा, गटारे, सेफ्टीक टँक, अंतर्गत रस्ते इत्यादी नागरी सेवा पुरविणे आवश्यक आहे. प्रती वसाहत अंदाजे रू. ८८.६३ लाख इतका खर्च येईल.

३. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व. पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून राहतील. या कामाचा निधी संचालकांनी पीएलए खात्यामध्ये जमा करुन तो संबंधित बांधकाम यंत्रणेला वितरीत करण्याची कार्यवाही करावयाची आहे.

४. या योजनेच्या अंमलबजावणीचे नियंत्रण अधिकारी म्हणून संबंधित विभागाचे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग हे राहतील.

५. उक्त योजनेची अंमलबजावणी तसेच नियम व अटी सोबत जोडलेल्या "परिशिष्ट-अ" मध्ये नमुद केलेल्या आहेत.

६. या योजनेसाठी आवश्यक तरतूद उपलब्ध करुन दिल्यानंतर खर्च करण्यात यावा.

७. प्रस्तुत शासन निर्णय महसूल व वन विभाग, गृहनिर्माण विभाग, ग्रामविकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१११२२७१९२५३६१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिनेश वाघमारे)
सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र परिशिष्ट - अ

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

मा. मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. प्रधान सचिव, महसूल व वन / वित्त / नियोजन / ग्रामविकास /गृह निर्माण/ उद्योग, उर्जा व कामगार/ कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
मा. सचिव यांचे, सा.न्या. यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा
व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई
सर्व उपविभागीय अधिकारी
सर्व तहसिलदार
सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
महालेखापाल (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२ मुंबई / नागपूर
सर्व कार्यासन अधिकारी, सा.न्या. व वि. स.विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती/ विजाभज -१

शासन निर्णय क्रमांकः गृनियो-२०११/प्र.क्र.१११/विजाभ-१ ,दिनांक २७/१२/२०११ चे सहपत्र

## परिशिष्ट "अ"

| | |
|---|---|
| पात्रता निकष | १) लाभार्थी कुटुंब हे विमुक्त जाती, भटक्या जमाती या मूळ प्रवर्गातील तसेच गावोगावी भटकंती करुन उपजिवीका करणारे असावे.<br>२) लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लक्ष पेक्षा कमी असावे.<br>३) लाभार्थी कुटुंबाचे स्वतःचे मालकीचे घर नसावे.<br>४) लाभार्थी कुटुंब हे झोपडी / कच्चे घर/ पालामध्ये राहणारे असावे.<br>५) लाभार्थी कुटुंब हे भूमिहीन असावे.<br>६) लाभार्थ्यी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.<br>७) लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>८) सदरहू योजनेचा लाभ पात्र कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.<br>९) लाभार्थी वर्षभरात किमान ६ महिने एका ठिकाणी वास्तव्यास असावा. |
| प्राधान्य क्रम | या योजनेसाठी विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील कुटूंबांना खालील प्रमाणे प्राधान्य क्रम देण्यात येईल.<br>१) पालात राहणारे.(गावोगावी भटकंती करुन उपजिविका करणारा)<br>२) दारिद्र रेषेखालील कुटूंब.<br>३) घरात कोणीही कमावत नाही अशा विधवा,परित्यक्त्या किंवा अपंग महिला<br>४) पूरग्रस्त क्षेत्र. |
| अटी व शर्ती | १) या योजने अंतर्गत लाभार्थी कुटुंबांना मिळणारा भूखंड व त्यावरील घर हे संयुक्तपणे पती व पत्नीच्या नावे केले जाईल. मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत भूखंड व त्यावरील घर त्यांच्या नावेच केले जातील.<br>२) या योजने अंतर्गत मिळालेला भूखंड व त्यावरील घर लाभार्थी कुटुंबास कोणत्याही कारणास्तव कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करता येणार नाही. तसेच भूखंड व घर कोणत्याही परिस्थितीत विकता येणार नाही.<br>३) या योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.<br>४) भूखंडा वरील जागेचा वापर हा कायदेशिर उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी असणे बंधनकारक राहील. तसेच घर हे भाडे तत्वावर अन्य व्यक्ती / कुटुंबास देता येणार नाही. तसेच पोट भाडेकरु सुध्दा ठेवता येणार नाही. तसे आढळून आल्यास सदरचा लाभ रद्द करण्यात येईल.<br>५. प्रस्तुत घराचे बांधकाम झाल्यानंतर ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणारी वार्षिक घरपट्टी व पाणीपट्टी लाभार्थ्याने भरणे आवश्यक राहील व घराचे देखभाल व दुरुस्ती ही लाभार्थ्यांने स्वतः करावयाची आहे. |

| | |
|---|---|
| जिल्हा स्तरीय समिती | सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे जिल्हा स्तरीय समिती असेल<br>१) जिल्हाधिकारी- अध्यक्ष<br>२) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद-सदस्य<br>३) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा- सदस्य<br>४) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी - सदस्य<br>७) सहाय्यक संचालक, नगर रचना-सदस्य<br>८) जिल्हा पशु संवर्धन अधिकारी-सदस्य<br>९) जिल्हा कृषि अधिक्षक-सदस्य<br>१०) व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र- सदस्य<br>११) जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक वित्त व विकास महामंडळ-सदस्य<br>१२)जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेला वि.जा.भ.ज. प्रवर्गासाठी कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता.<br>१३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी-सदस्य सचिव,<br><br>सदरहू जिल्हा स्तरीय समितीचे कार्य हे पुढील प्रमाणे राहील :-<br>१) सदरहू योजने करीता शासकीय जमिनीची निवड करणे.<br>२) शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास खाजगी जमिनीचे दर निश्चित करणे व ती खरेदी करणे.<br>३) पात्र लाभार्थी कुटुंबांची निवड करणे. पात्र लाभार्थ्याला किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्याला शासनाच्या अन्य योजनेमधून यापूर्वी घरकुल मिळालेले नाही याची खात्री करणे .<br>४) उपलब्ध शासकीय / खाजगी जमिनीचा ले-आऊट करुन प्रत्येक लाभार्थी कुटुंबास ५ गुंठ्याचा भूखंड देवून त्यावर घर बांधून देणे. ले- आऊट करत असताना रस्ते, गटारे, समाज मंदीर, शाळा/अंगणवाडी (शक्य असेल तेथे), खुली जागा इत्यादी साठी जागा राखून ठेवण्यात यावी.<br>५) लाभार्थ्यांकडुन घरकुलांचे बांधकाम तसेच वसाहती अंतर्गत पायाभूत सुविधा याबाबतची कामे वेळेत पुर्ण करुन घेणे.<br>६) भूखंडांचे व घरकुलांचे पात्र लाभार्थी कुटुंबांना वाटप करणे.<br>७) सदरहू लाभार्थी कुटुंबांना विविध शासकीय योजनांव्दारे स्वयंरोजगार निर्मितीची संधी उपलब्ध करुन देणे.<br>८) वसाहतींचे प्रकल्प अहवाल, नकाशे व अंदाजपत्रके याबाबतचा अहवाल संचालक, वि.जा.भ.ज. यांचे मार्फत शासनास मंजूरीसाठी सादर करणे. |
| तालूका स्तरीय समिती व | या योजनेसाठी सुयोग्य शासकीय जमिनीची जिल्हास्तरीय समितीस कार्यान्वयन समिती शिफारस करण्यासाठी आणि शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास जिल्हा स्तरीय समितीस जमिन खरेदी करुन लाभार्थ्यांना वितरण करणे या प्रक्रिये मध्ये सहाय्य करणेसाठी संबंधित तालूक्याचे उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली |

| | |
|---|---|
| लाभार्थ्यांची निवड, | तालूका स्तरावर खालील प्रमाणे तालुकास्तरीय कार्यान्वयन समिती असेल. सदरहू समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल जिल्हास्तरीय समितीकडे सादर करण्यात यावा. |

| | |
|---|---|
| १) उपविभागीय अधिकारी- | समिती प्रमुख |
| २) तहसिलदार- | सदस्य |
| ३)गट विकास अधिकारी, पंचायत समिती- | सदस्य |
| ४) तालूका निरीक्षक भूमि अभिलेख- | सदस्य |
| ५) म.रा.विद्युत वितरण कंपनीचा प्रतिनिधी - | सदस्य |
| ६) तालूका कृषि अधिकारी- | सदस्य |
| ७) संबंधित मंडल अधिकारी- | सदस्य |
| ८ ) प्रदेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग कार्यालयातील निरीक्षक- | सदस्य सचिव |

| | |
|---|---|
| जमिन उपलब्ध करण्याची कार्यपध्दत | जिल्हयात ग्रामीण भागामध्ये ज्या ठिकाणी विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील बेघर व भूमीहीन कुटुंबाची संख्या जास्त आहे अशा ठिकाणांचा शोध घेवून त्यानुसार शासकीय जमिन उपलब्ध करुन घ्यावी. शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास खाजगी जमिनीची खरेदी करण्यात यावी. जमिन खरेदी करताना सदरहू जमिनीवर उभारण्यात येणाऱ्या वसाहतीस आवश्यक तो निवासी पाणी पुरवठा वर्षभर होऊ शकेल का ? याबाबत खात्री करुनच जमिन खरेदी करावी. त्याबाबतचे अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहतील. खाजगी जमिन उपलब्ध करण्यासाठी संबंधित भागात मागील ५ वर्षाचे खरेदी विक्री व्यवहार व प्रचलित शिघ्र सिध्दगणकांचे दर विचारात घेवून जमिन खरेदी करण्यात यावी. त्या दराने जमिन विक्रीस जमिन मालक तयार नसला तर उपलब्ध दरापैकी जो दर जास्त असेल त्यावर २०%पर्यंतइतकी वाढ करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय समितीला असतील. |
| लाभार्थ्यांने सादर करावयाची कागदपत्रे | १) सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र.<br>२) कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लक्ष पेक्षा कमी असल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र.<br>३) भूमीहिन असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र.<br>४) महाराष्ट्र राज्यातील वास्तव्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र.<br>५) कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीने महाराष्ट्र राज्यात इतर कोणत्याही ठिकाणी घरकुल योजनेचा लाभ घेतला नसल्याबद्दलचे रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र. |
| भूखंड व त्यावरील घराचे | सदरहू योजना ही ग्रामिण भागामध्ये राबविण्यात येणार असून प्रत्येक लाभार्थी कुटुंबास ५ गुंठे क्षेत्रफळाचा भूखंड देण्यात येईल. त्यावर २६९ चौ.फुट चटई क्षेत्राचे घर बांधून देण्यात येईल. घराच्या बांधकामासाठी कमाल खर्चाची मर्यादा रु. ७० हजार इतकी |

| | |
|---|---|
| क्षेत्रफळ व किंमत | असेल. घराचा आराखडा हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी राबविण्यात येत असलेल्या घरकुल योजनेतील घराच्या आराखडया प्रमाणेच राहील. |
| सर्वेक्षण करणे | सदरहू योजनेसाठी पात्र लाभार्थी कुटुंबांच्या सर्वेक्षणाचे काम हे तलाठी व ग्रामसेवक यांच्याकडून करुन घेण्यात यावे. सर्वेक्षण करणे, योजनेचे मार्गदर्शन करणे इ. बाबींसाठी प्रशासकीय खर्च म्हणून ५ टक्के रक्कम या योजनेसाठी उपलब्ध होणा-या निधीमधून प्रथमत: राखून ठेवण्यात यावी व उर्वरित निधीमधून निवड झालेल्या लाभार्थ्यांची प्रकरणे तयार करावीत, वसाहत प्रकल्पाचा अहवाल तयार करणे. |
| वसाहतीचा प्रकल्प अहवाल बांधकाम तसेच पायाभूत सुविधा | सदरहू योजने अंतर्गत घराचे बांधकाम करणे तसेच वसाहतीमध्ये पायाभूत सुविधा उदा. पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, अंतर्गत रस्ते, गटारे, समाज मंदिर इत्यादी सर्व बाबी विचारात घेवून प्रत्येक वसाहतीचा प्रकल्प आराखडा, नकाशा व अंदाजपत्रके तयार करणे तसेच नागरी सुविधाची ही कामे पुर्ण करुन देण्याचे काम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून करुन घेण्यात यावें. सदरहू योजनेंतर्गत घराचे बांधकाम करणे तसेच वसाहती मध्ये घरांचे बांधकाम शक्यतो लाभार्थ्यांमार्फतच करावे. त्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जिल्हा विकास यंत्रनेमार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात बांधकामाच्या प्रगतीनुसार तीन टप्प्यात अदा करण्यात यावी. लाभार्थीने घरकुलाचे बांधकाम करण्यास असमर्थता दर्शविल्यास काही अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत जिल्हाधिकारी यांनी निवड केलेल्या बांधकाम व्यवसायातील नामांकित संस्था/स्वयंसेवी संस्थामार्फत घराचे बांधकाम करण्यास हरकत नसावी. तथापि अशा संस्थाची निवड शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल. |
| स्वयंरोजगार निर्मिती | वसाहती मधील लाभार्थी कुटुंबांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध व्हावी म्हणून पशुसंवर्धन, कृषी, जिल्हा उद्योग केंद्र, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ तसेच जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांच्या मार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांव्दारे संधी उपलब्ध करुन देण्यात यावी. शक्य असेल तेथे बचत गटाची स्थापना करुन त्याव्दारे देखील लाभार्थी कुटुंबांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात यावी. रोजगाराच्या योजना राबवितांना त्या त्या विभागाच्या संबंधित अधिका-यांची जबाबदारी राहील. सदरहू कामासाठी निधी त्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीत तरतुदीमधुन तसेच संबंधित विभागांच्या मंजुर योजनेमधुन वापरावा. |

*****************